अर्धसाप्ताहिक

# ब्रम्हपुरी समाचार

संपादक
अशोक भैया

RNI No. MAHMUL/2016/69789

E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com

Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25

गुरूवार, दि. 22 ऑक्टोबर 2026 | वर्ष 12 वे | अंक 11 वा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

## अभिजित वंजारी, सुधाकर कोहळे आणि नितेश कराळेंमध्ये चुरस

### नागपूर पदवीधर मतदार संघ निवडणुक महासंग्राम



ब्रम्हपुरी/का.प्र.

महाराष्ट्र विधान परिषदेच्या अत्यंत चुरशीच्या मानल्या जाणाऱ्या तीन पदवीधर आणि दोन शिक्षक मतदारसंघांच्या द्विवार्षिक निवडणुकीचा रणसंग्राम आता अंतिम टप्प्यात पोहोचला आहे. आगामी शुक्रवार, २३ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ४ या वेळेत या निवडणुकीसाठी मतदान पार पडणार असून, संपूर्ण राजकीय वर्तुळाचे लक्ष नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाकडे लागले आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नागपूर विभागात राजकीय घडामोडींना प्रचंड वेग आला आहे.

विधान परिषदेच्या रिक्त होत असलेल्या जागांसाठी राज्यभरातून तब्बल १८२ उमेदवार निवडणूक रिंगणात आपले नशीब आजमावत आहेत. केवळ नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघातून ३८ उमेदवार निवडणुकीच्या मैदानात उतरले आहेत. मतदारांची गैरसोय टाळण्यासाठी आणि सुलभ मतदान प्रक्रियेसाठी नागपूर विभागात तब्बल ४४५ मतदान केंद्रे उभारण्यात आली आहेत. विधान परिषदेच्या संबंधित जागांवरील विद्यमान सदस्यांचा कार्यकाळ आगामी ६ डिसेंबरला पूर्ण होत आहे. यात नागपूर पदवीधर मतदारसंघाचे विद्यमान आमदार अभिजीत वंजारी यांचाही समावेश आहे. निवडणूक आयोगाच्या सुधारित वेळापत्रकानुसार २३ ऑक्टोबरला मतदान झाल्यानंतर, मंगळवार, २७ ऑक्टोबर रोजी मतमोजणी होणार असून, संपूर्ण निवडणूक प्रक्रिया ३१ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण केली जाणार आहे.

या निवडणुकीत काँग्रेस पक्षाकडून विद्यमान आमदार अभिजीत वंजारी पुन्हा एकदा आपले वर्चस्व राखण्यासाठी मैदानात उतरले आहेत. त्यांच्या विरोधात भारतीय जनता पक्षाने (भाजप) सुधाकर कोहळे यांना उमेदवारी देत तगडे आव्हान उभे केले आहे. मात्र, या दोन राजकीय पक्षांच्या पारंपरिक लढतीमध्ये एका अपक्ष उमेदवाराने सर्वपक्षीय समीकरणे ढवळून काढली आहेत. युवा वर्गात आणि सोशल मीडियावर प्रचंड लोकप्रियता असलेले नितेश कराळे गुरुजी यांनी अपक्ष उमेदवार म्हणून निवडणुकीत उडी घेतल्याने सामना अत्यंत रंजक बनला आहे.

(उर्वरित पान क्र. ६ वर)

## ने.हि. कन्या विद्यालयाच्या हॅण्डबॉल संघाची राज्यस्तरावर ऐतिहासिक गरूडझेप

### विद्यालयाच्या दोन खेळाडूंची राष्ट्रीय स्तरावर निवड



ब्रह्मपुरी/का.प्र.

क्रीडा आणि शिक्षणाच्या क्षेत्रात सातत्याने अग्रेसर असलेल्या नेवजाबाई हितकारिणी कन्या विद्यालय, ब्रह्मपुरीच्या विद्यार्थिनींनी पुन्हा एकदा आपल्या अफाट जिद्दीने आणि उल्लेखनीय नैपुण्याने संपूर्ण नागपूर विभागाचे व शाळेचे नाव राज्य पातळीवर उज्वल केले आहे. क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे आणि उपसंचालक क्रीडा व युवक सेवा संचालनालय, कोल्हापूर विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने कोल्हापूर येथील महाराष्ट्र विद्यालयात दिनांक १० ते १२ ऑक्टोबर वर्षांखालील मुलींच्या संघाने दिमाखदार कामगिरी करीत तृतीय प्राविण्य पटकावले आहे.

या राज्यस्तरीय क्रीडा महासंग्रामणात महाराष्ट्रातील ६ विभागांमधून आलेल्या अत्यंत हुशार व निपुण खेळाडूंनी सहभाग घेतला होता. अशा अटीतटीच्या व चुरशीच्या सामन्यांमध्ये नेवजाबाई हितकारिणी कन्या विद्यालयाच्या संघातील खेळाडूंनी चमकदार खेळ करत तृतीय क्रमांक पटकावून एका ऐतिहासिक यशाला गवसणी घातली. या संघाच्या संपूर्ण प्रवासात खेळाडूंनी दाखवलेली जिद्द, सांघिक समन्वय आणि शिस्त खरोखरच कौतुकास्पद ठरली. या राज्यस्तरीय स्पर्धेत आपल्या खेळाची विलक्षण छाप पाडत उत्कृष्ट नैपुण्य सादर करणाऱ्या पुनम आनंद लांजेवार, संध्या विष्णू दिघोरे दोन गुणवान खेळाडूंची थेट राष्ट्रीय स्तरावरील महाराष्ट्र संघात निवड करण्यात आली आहे. या दोन्ही प्रतिभावान विद्यार्थिनींच्या राष्ट्रीय संघातील निवडीमुळे ब्रह्मपुरी तालुक्यासह संपूर्ण नागपूर विभागाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, संपूर्ण परिसरातून या गुणी मैत्रिणींवर अभिनव शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

संघाच्या या उज्ज्वल व प्रेरणादायी कामगिरीची दखल घेत दिनांक १५ ऑक्टोबर २०२६ रोजी संस्थेचे सचिव अशोकजी भैया यांनी राष्ट्रीय खेळाडूंचे प्रत्यक्ष कौतुक केले व त्यांना पुढील वाटचालीसाठी खूप-खूप शुभेच्छा दिल्या. त्यांनी आपल्या मार्गदर्शक मनोगतात सांगितले की, विद्यार्थ्यांनी केवळ शैक्षणिक प्रगतीपर्यंत मर्यादित न राहता क्रीडा क्षेत्रातही आपले कसब सिद्ध करून शाळेचे आणि राज्याचे नाव राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर झळकवावे. तसेच संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती स्नेहलताबाई किसनलालजी भैया, शाळेच्या मुख्याध्यापिका बनपूरकर मॅडम, उपमुख्याध्यापक निखारे सर आणि पर्यवेक्षिका खंडाते मॅडम यांनी सर्व खेळाडूंचे तोंडभरून कौतुक केले असून, त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली आहे.

या दैदिप्यमान यशामागे शाळेला मिळालेले खमके आणि

(उर्वरित पान क्र. ६ वर)



## संपादकीय...

# पुन्हा गुंडांचे राज्य?

पडद्यावर खलनायकांना धूळ चारणारा नायकच प्रत्यक्ष आयुष्यात गुंडांच्या बंदुकीच्या निशाण्यावर आला, तर मुंबईच्या सुरक्षेबद्दल सामान्य माणसाने काय विचार करायचा? जुहूमध्ये अभिनेता टायगर श्रॉफच्या मोटारीवर झालेल्या गोळीबाराने चित्रपटसृष्टीतील जुन्या अंडरवर्ल्डच्या दहशतीच्या आठवणी पुन्हा जाग्या केल्या आहेत. सलमान खान, बाबा सिद्दीकी, रोहित शेट्टी यांच्याशी संबंधित हिंसक घटनांनंतर आता आणखी एका अभिनेत्याला लक्ष्य करण्यात आल्याने गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. गुंडांना प्रसिद्धी मिळवण्यासाठी गोळ्या झाडण्याचे धाडस होत असेल, तर केवळ आरोपी पकडून भागणार नाही; त्या बंदुकांमागचे आदेश, पैसा आणि संपूर्ण गुन्हेगारी जाळे शोधावे लागेल.

मुंबईच्या रस्त्यांवर गोळ्या झाडून चित्रपटसृष्टीला धमकावण्याचे दिवस इतिहासजमा झाले, असे वाटत असतानाच जुहूमध्ये अभिनेता टायगर श्रॉफच्या मोटारीवर झालेल्या गोळीबाराने पुन्हा एकदा धोक्याची घंटा वाजविली आहे. चित्रपटातील खलनायकाला पराभूत करणारा नायक प्रत्यक्ष आयुष्यात गुंडांच्या बंदुकीच्या निशाण्यावर येतो, ही केवळ एका अभिनेत्याच्या सुरक्षेची बाब नाही. ती देशाच्या आर्थिक राजधानीतील कायदा आणि सुव्यवस्थेलाच दिलेली उघड धमकी आहे. सलमान खानच्या निवासस्थानाबाहेरील गोळीबार, बाबा सिद्दीकी यांची हत्या, रोहित शेट्टी यांच्या घराजवळील गोळीबार आणि आता टायगर श्रॉफवरील हल्ला या घटनांमुळे मुंबईतील संघटित गुन्हेगारीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. प्रसिद्ध व्यक्तींना लक्ष्य करून स्वत:ची दहशत निर्माण करणाऱ्या टोळ्यांना आता केवळ बंदूकधारी पकडून नव्हे, तर त्यांचे संपूर्ण गुन्हेगारी जाळे उद्धवस्त करूनच उत्तर द्यावे लागेल. रविवारी सायंकाळी जुहूतील फुटबॉल मैदानावरून परतणाऱ्या टायगर श्रॉफच्या मोटारीवर हल्लेखोरांनी गोळीबार केला. अभिनेता सुदैवाने बचावला; मात्र त्याचा चालक फिरदौस बलोच आणि उमेश चौहान नावाचा नागरिक जखमी झाला. हल्लेखोरांनी पाच गोळ्या झाडल्याचे तपासात समोर आले असून, एका बंदुकीत बिघाड झाल्यामुळे पुढील गोळीबार थांबल्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

गुन्हेगार राज्यांच्या सीमा ओलांडून कारवाया करीत असताना पोलिसांनीही परस्पर समन्वयाने काम करणे आवश्यक आहे. मुंबई पोलिसांची माहिती, राजस्थान पोलिसांची प्रत्यक्ष कारवाई आणि अन्य यंत्रणांचे सहकार्य यांमुळे आरोपी पकडले गेले असतील, तर ते सामूहिक यश आहे. गुन्हेगारीविरोधातील लढाई ही प्रसिद्धी मिळविण्याची स्पर्धा नाही. या हल्ल्याची जबाबदारी बिश्नोई टोळीच्या नावाने समाजमाध्यमांवर स्वीकारण्यात आली आहे. मात्र असा दावा म्हणजे न्यायालयात सिद्ध झालेला गुन्हा नव्हे. संबंधित संदेश खरोखर कोणाकडून प्रसारित झाला, आरोपींना आदेश कोणी दिले आणि हल्ल्यासाठी पैसा कोणी पुरविला, याचा पुराव्यांच्या आधारे तपास झाला पाहिजे. कारण गुन्हेगारी टोळ्यांची एक नवी कार्यपद्धती समोर येत आहे. स्वत: सुरक्षित अंतरावर राहायचे, आर्थिकदृष्ट्या असुरक्षित तरुणांना पैशाचे किंवा परदेशात स्थायिक होण्याचे आमिष दाखवायचे, त्यांच्याकडून गोळीबार घडवून आणायचा आणि नंतर समाजमाध्यमांवरून जबाबदारी स्वीकारून दहशत निर्माण करायची. टायगर श्रॉफ प्रकरणातही आरोपींना पैशांचे आणि परदेशातील संधीचे आमिष दाखविल्याची माहिती तपासातून पुढे येत आहे. ही पद्धत विशेष चिंताजनक आहे. कारण गुन्हेगारीच्या जाळ्यात अडकणारे तरुण अनेकदा स्वत:च्या भविष्याचा विचार न करता काही हजार रुपयांसाठी गंभीर गुन्ह्यांत सहभागी होतात. समाजमाध्यमांवरील गुंडांचे उदात्तीकरण आणि झटपट पैसा मिळविण्याचे आकर्षण या प्रवृत्तीला खतपाणी घालू शकते. म्हणून बंदूकधाऱ्यांना अटक करणे पुरेसे नाही.टायगर श्रॉफवरील हल्ल्यातील संशयित पकडले गेले, ही दिलासादायक बाब आहे. मात्र त्यातून गुन्हेगारीचे मूळ संपले, असे मानण्याचे कारण नाही. मुंबई पोलिसांनी पूर्वी मोठमोठ्या गुन्हेगारी टोळ्यांना कायद्याच्या कचाट्यात आणले आहे. आता त्या अनुभवाचा उपयोग नव्या पद्धतीने काम करणाऱ्या टोळ्यांविरुद्ध करावा लागेल. बंदुका चालविणाऱ्यांना आदेश देणारे हात पकडले, तरच मुंबईच्या सुरक्षेचा खरा विजय होईल !

# राष्ट्र घडवायचं असेल तर महिलांनी जागृत व्हावं

## - माणिकताई कद्रे

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरी येथे राष्ट्र सेविका समितीचा विजयादशमी उत्सव विठ्ठल मंदिर सभागृहात



उत्साहात आणि चैतन्यमय वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमा मध्ये सेविकांनी सूर्य नमस्कार, दंड, गणसमता, यष्टी, योगासन आणि सांघिक व्यायाम प्रात्यक्षिके सादर केले. विशाखाताई पंडे यांनी प्रास्ताविक, उपस्थितांचे स्वागत केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षा आणि ब्रम्हपुरी अर्बन को.ऑपरेटिव्ह बँकेच्या संचालिका प्रीतीताई कलंत्री यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात, समितीची शाखा ही महिलांमध्ये शारीरिक-मानसिक बळ आणि आत्मविश्वास वाढवणारी असून सेवाभावाने एकजूट होण्याचे आवाहन केले.

या, कार्यक्रमाच्या प्रमुख वक्ता, विदर्भ प्रांत सेवा प्रमुख व चंद्रपूर विभाग पालक माणिक मावशी कद्रे यांनी आपल्या प्रेरणादायी उद्बोधनात सांगितले की, राष्ट्र उभारणीत स्त्री शक्तीचे स्थान अनन्यसाधारण आहे. मावशी केळकर यांनी विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर स्थापन केलेल्या राष्ट्र सेविका समितीच्या या ९० वर्षांच्या यशस्वी प्रवासात कौटुंबिक संस्कार, वैयक्तिक चरित्र आणि राष्ट्रवैभवाची पायाभरणी झाली आहे. आज महिला सैन्य, वैद्यकीय, उद्योग क्षेत्रापासून थेट राष्ट्रपती पदापर्यंत समर्थ नेतृत्व करत आहेत. सध्या समितीद्वारे देशभरात २,८६६ हून अधिक सेवा कार्य सुरू आहे. राष्ट्र सेविका समितीच्या भारतभर शाखा ४८८६ तर भारताबाहेर विविध शाखा सुरू आहे. अन्य सेवाकार्य मोठ्या प्रमाणात सुरू आहे. या माध्यमातून महिलांमध्ये डिजिटल व्हिजन, पर्यावरण आणि सायबर सुरक्षेबाबतही महत्त्वपूर्ण जागृती निर्माण केली जात असल्याचे त्यांनी शेवटी स्पष्ट केले.

प्रसंगी वैयक्तिक गीत साधना देशमुख, सुभाषित सुष्मिता शिनखेडे, तर अमृत वचन वैदेही पिंपळापुरे यांनी सादर केले.आभार प्रदर्शन नगर सहकार्यवाहिका शरयू भानारकर यांनी केले. उत्सवाची सांगता वंदेमातरम् या गीताने झाली.

# अवैध गोवंश वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई; तीन अटकेत

## ५ गोवंशाची सुटका, वाहनासह ५.४५ लाखांचा मुद्देमाल जप्त

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी-चांदगाव मार्गावरील दुपारे लॉन्ससमोर पोलिसांनी ही धडक कारवाई केली. यात ५ लाख ४५ हजार रुपयांच्या मुद्देमालासह अवैध वाहतूक करणाऱ्या टोळीला रंगेहात पकडण्यात आले आहे. गोष्ट आहे १७ ऑक्टोबरच्या रात्री १० वाजताची. पोलीस अंमलदार निलेश तुमसरे आणि त्यांचे सहकारी पथक परिसरामध्ये गस्त घालत होते. त्याच वेळी एका खबऱ्याकडून पोलिसांना अत्यंत गुप्त बातमी मिळाली. चांदगावच्या बाजूने ब्रम्हपुरीकडे एका पांढऱ्या रंगाच्या 'महिंद्रा बोलेरो मॅक्सी ट्रक' (क्र. MH 36 AA 2966) मधून गोवंशाची अत्यंत निर्दयपणे वाहतूक केली जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

बातमी मिळताच पोलिसांनी जराही वेळ न गमावता दोन पंचांना सोबत घेतले आणि ब्रम्हपुरी-चांदगाव रस्त्यावरील दुपारे लॉन्ससमोर नाकाबंदी करून सापळा रचला. संशयीत वाहनाची तपासणी केली असता छोट्याशा वाहनात १ गोऱ्हा आणि ४ गायी अशा एकूण ५ प्राण्यांना अत्यंत क्रूरपणे डांबून ठेवले होते. प्राण्यांना साधे हालचाल करायलाही जागा नव्हती. प्रवासात त्यांच्यासाठी चारा तर दूरच, पण पिण्याच्या पाण्याचीही कोणतीही सोय केली नव्हती. जेव्हा पोलिसांनी गाडीतील लोकांकडे वाहतुकीच्या परवान्याबाबत विचारणा केली, तेव्हा त्यांच्याकडे कोणताही वैध परवाना आढळून आला नाही.

पोलिसांनी तात्काळ पंचनामा करून सर्व मुद्देमाल जप्त केला. यात ४५,००० रुपये किमतीचे ५ गोवंश आणि वाहतुकीसाठी वापरलेली ५ लाख रुपयांची बोलेरो गाडी असा एकूण ५,४५,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यात वाहनचालक श्यामु कुसन मालाधरे (वय २८ वर्ष, रा. बोडेगाव, ता. ब्रम्हपुरी), कुसन केवल मालाधरे (वय ६६ वर्ष, रा. बोडेगाव, ता. ब्रम्हपुरी),राजकुमार नथ्थु मनघटे (वय ५५ वर्ष, रा. करझखेडा, जि. भंडारा) यांचा समावेश आहे.

सुटका करण्यात आलेल्या या ५ गोवंशांना सुरक्षिततेसाठी आणि योग्य देखभालीसाठी तातडीने हळदा येथील 'गोविंद गोशाळेत' हलवण्यात आले आहे. पोलीस अंमलदार निलेश तुमसरे यांच्या तक्रारीवरून ब्रम्हपुरी पोलीस ठाण्यात तिन्ही आरोपींविरुद्ध प्राणी छळ प्रतिबंध अधिनियम कलम ११(१) (ड),११(१) (इ),११ (१) (फ), महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ११९ आणि भारतीय न्याय संहितेच्या ३(५) या कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## विनोदिनी

१० दिनों के लिए मायके गई पत्नी ने दो दिन बाद मायके से पति को फोन किया.. और पुछा... 'कैसे हो..?'

पति - 'ठीक हूँ...'

पत्नी - 'मेरी याद आती है तब क्या करते हो ?'

पति - 'तुम्हारी पसंदीदा आइसक्रीम 'केसर पिस्ता' खा लेता हू या 'अमूल नट्स' खा लेता हूँ.. अब तुम बताओ मेरी याद आने पर तुम क्या करती हो ?'

पत्नी - 'मै भी 'रॉयल स्टैग' का एक क्वाटर और तीन सिगरेट पीकर एक रजनीगंधा खा लेती हूँ...।

पति बेहोश।

# दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शहरात आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी

## नगराध्यक्ष व मुख्याधिकाऱ्यांना नगरसेवक अविनाश राऊत यांचे पत्र

ब्रम्हपुरी/का.प्र.

महाराष्ट्रातील बहुसंख्य तालुक्यांमध्ये राज्य सरकारने दुष्काळ घोषित केला आहे. त्यात ब्रम्हपुरी तालुक्याचाही समावेश करण्यात आला आहे. संभाव्य दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर ब्रम्हपुरी शहरातील पाणीटंचाई निवारणासाठी पूर्वनियोजन व आवश्यक उपाययोजना करण्याकरिता नगरपरिषदेची विशेष सभा बोलाविण्याबाबत नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांना नगरसेवक अविनाश राऊत यांनी विनंतीवजा सुचना केली आहे.

राज्यातील काही भागांत निर्माण होत असलेली दुष्काळसदृश परिस्थिती, पर्जन्यमानातील अनिश्चितता तसेच आगामी उन्हाळ्यात पाण्याच्या उपलब्धतेवर होणारा संभाव्य परिणाम लक्षात घेता, ब्रम्हपुरी शहरात भविष्यात पिण्याच्या पाण्याची गंभीर टंचाई निर्माण होऊ नये, यासाठी आतापासूनच आवश्यक पूर्वनियोजन व प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे अत्यंत गरजेचे आहे.



पिण्याचे पाणी ही नागरिकांची मूलभूत गरज असून, संभाव्य दुष्काळी परिस्थितीत शहरातील नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागू नये, यासाठी नगरपरिषद प्रशासनाने विद्यमान जलस्रोतांची उपलब्धता, पाणीसाठा, पाणीपुरवठा योजनेची क्षमता तसेच पर्यायी जलस्रोतांचा सखोल आढावा घेणे आवश्यक आहे.

पाणीटंचाई निर्माण झाल्यानंतर तात्पुरत्या उपाययोजना करण्याऐवजी संभाव्य संकटाचा पूर्वअंदाज घेऊन वेळीच नियोजन केल्यास भविष्यातील गंभीर परिस्थिती टाळणे शक्य होईल. त्यामुळे या अत्यंत महत्त्वाच्या लोकहिताच्या विषयावर नगरपरिषद स्तरावर सविस्तर चर्चा करून आवश्यक निर्णय घेण्यासाठी नगरपरिषदेची विशेष सभा तातडीने बोलाविण्यात यावी, अशी मागणी केली आहे.

विशेष सभेमध्ये शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या जलस्रोतांमधील उपलब्ध पाणीसाठा, त्यांची क्षमता आणि आगामी उन्हाळ्यापर्यंत पाणीपुरवठा करण्याची संभाव्य क्षमता यांचे तांत्रिक मूल्यांकन करणे, शहराची दैनंदिन पाण्याची गरज व उपलब्धता यांचा तुलनात्मक अभ्यास करून संभाव्य पाणीटंचाईचा अंदाज घेणे आणि त्यानुसार प्रभागनिहाय उपाययोजना निश्चित करणे, विद्यमान जलस्रोतांमधील पाणीसाठा कमी झाल्यास शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी पर्यायी जलस्रोत, विहिरी, तलाव व इतर उपलब्ध स्रोतांचे सर्वेक्षण करून त्यांची तांत्रिक व्यवहार्यता तपासणे, विद्यमान तलाव व नैसर्गिक जलसाठ्यांचे सर्वेक्षण करून आवश्यकतेनुसार गाळ काढणे, खोलीकरण, जलसाठवण क्षमता वाढविणे आणि जलसंवर्धनाच्या उपाययोजना राबविण्याबाबत नियोजन करणे, शहरातील जलवाहिन्यांमधील गळती, जीर्ण जलवाहिन्या आणि पाणी वितरणातील तांत्रिक त्रुटी दूर करून उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर करण्यासाठी तातडीने उपाययोजना करणे, संभाव्य दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांचे प्रस्ताव तयार करून महाराष्ट्र शासन, जिल्हाधिकारी कार्यालय, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व संबंधित विभागांकडे निधी आणि तांत्रिक मदतीसाठी पाठपुरावा करणे यासोबतच सर्व उपाययोजनांच्या अंमलबजावणीसाठी संबंधित विभागांची जबाबदारी निश्चित करून तातडीचा कृती आराखडा तयार करणे व त्याच्या प्रगतीचा नियमित आढावा घेण्यात याव्या, अशा सुचना केल्या आहेत.

यासाठी ब्रम्हपुरी शहराच्या भविष्यातील पाणीपुरवठ्याचे गांभीर्य लक्षात घेऊन नगरपरिषदेची विशेष सभा तातडीने बोलाविण्यात यावी. सदर सभेत संबंधित विभागांकडून उपलब्ध पाणीसाठा व संभाव्य पाणीटंचाईबाबत अहवाल सादर करून आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे ठराव मंजूर करण्यात यावेत. तसेच त्यांची कालबद्ध अंमलबजावणी करून आवश्यक निधीसाठी शासनाकडे तातडीने पाठपुरावा करण्यात यावा अशी मागणी नगरसेवक अविनाश राऊत यांनी पत्राद्वारे केली आहे.

# अवघ्या २४ तासात शेतकऱ्यांची समस्या मार्गी

## तनय देशकर यांच्या प्रयत्नाने शेतकऱ्यांच्या बांधावर तात्काळ नवीन डीपी

ब्रम्हपुरी/का.प्र.

शेतकऱ्यांनी समस्या मांडल्यानंतर अवघ्या २४ तासांच्या आत प्रश्न मार्गी लावण्यात आल्याने वांद्रा परिसरातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. वांद्रा परिसरातील कोसंबी रोडवरील जळालेली विद्युत डीपी बदलून नवीन डीपी बसविण्यात आली.

काही दिवसांपूर्वी कोसंबी रोडवरील विद्युत डीपी जळाली होती. त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांसमोर शेतीला पाणी देण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता. एकीकडे पावसाने दडी मारल्याने धानपिकाला पाण्याची नितांत गरज होती, तर दुसरीकडे विद्युत डीपी बंद पडल्यामुळे मोटारपंप चालवून पिकांना पाणी देणे कठीण झाले होते. पावसाच्या लहरीपणामुळे आधीच संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या अडचणीत यामुळे आणखी भर पडली होती.

या गंभीर परिस्थितीत परिसरातील शेतकऱ्यांनी भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष तनय दादा देशकर यांच्याशी संपर्क साधून आपली अडचण मांडली. शेतकऱ्यांची समस्या लक्षात घेत तनय देशकर यांनी वेळ न दवडता महावितरण विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांशी समन्वय साधला. डीपी बदलून नवीन डीपी बसविण्यासाठी त्यांनी तत्परतेने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांमुळे कोसंबी रोडवरील नवीन डीपी बसविण्यात आली आणि शेतकऱ्यांना दिलासा मिळाला.

धानपिकाला पाणी देण्यासाठी वीजपुरवठा अत्यंत महत्त्वाचा असताना योग्य वेळी हा प्रश्न मार्गी लागल्याने शेतकऱ्यांना मोठा आधार मिळाला आहे. शेतीसाठी अडथळा ठरत असलेल्या विद्युत डीपीचा प्रश्न सोडविल्याबद्दल वांद्रा येथील शेतकरी रामकृष्ण मेश्राम, नवलाजी भागडकर, ईश्वर घुबडे, संदीप कोरटे, आक्सापुर येथील प्रशांत शेंडे, यशवंत निकोडे, जालिंदर कोसरे, कोसंबी येथील वामन मोहुर्ले, वसंत मलोडे व आवळगाव येथील रामकृष्ण खोये यांच्यासह शेतकऱ्यांनी भाजयुमो चंद्रपूर जिल्ह्याचे अध्यक्ष तनय देशकर व महावितरणचे आभार मानले आहेत.

# विद्यार्थ्यांकरीता मार्गदर्शन कार्यशाळा

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तुलानमाल येथे किशोरवयीन मुले व मुलीकरिता विविध लैंगिक विषयावर मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी सामाजिक कार्यकर्ती व या विषयाचे अभ्यासक कल्पना सूर्यवंशी व गेडाम मॅडम प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष विजय कुंभारे, टीकाराम बोकडे, भोयर सर, कैलास मेहेर प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी गेडाम मॅडम यांनी गुड टच-बॅड टच, किशोर वयात शरीरात होणारे बदल, संरक्षण आणि आत्मरक्षण करण्यासाठी उपाय योजना, बालरक्षण, पोस्को कायदा आदी विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे संचलन जगदीश मेहेर यांनी तर अंजली शेंद्रे हिने आभार मानले. यावेळी शाळेतील सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

# मागासवर्गीय वसतीगृह चालक संघटनेचे अति.मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना निवेदन




ब्रम्हपुरी/का.प्र.

चंद्रपूर जिल्ह्यातील मागासवर्गीय अनुदानित वसतीगृहांच्या व्यवस्थापनाला सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या खर्चावर आधारित देय असणारे सन २०२६ - २७ मधील ६० टक्के अग्रीम अनुदान अद्यापही प्राप्त न झाल्याने संघटनेचे जिल्हा सचिव अशोक रामटेके यांचे नेतृत्वात जिल्ह्यातील वस्तीगृह संस्थाचालकांच्या एका शिष्टमंडळाने १५ ऑक्टोबर रोजी जिल्हा परिषदेच्या अति. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.

वसतीगृहांना परिपोषण अनुदान वितरित करण्यासाठी शासनाने अलीकडेच समाज कल्याण विभागाला मोठ्या प्रमाणात अनुदान उपलब्ध करून दिल्यानंतरही अनुदान मिळण्यास विलंब होत असल्याबद्दल शिष्टमंडळाने तीव्र शब्दात नाराजी व संताप व्यक्त केला. अति. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी यामध्ये तातडीने लक्ष घालून वसतीगृहांना विना विलंब अनुदान मिळेल अशी व्यवस्था करण्याचे आश्वासन यावेळी शिष्टमंडळाला दिले.

अशोक रामटेके यांचेसह शिष्टमंडळात सुरेश निनावे, अखिल ताडशेट्टीवार, प्रबोधन भगत, नरेंद्र चहांदे, राजेंद्र वाढई, राजाभाऊ पेटकर, गंगाधर गुरनुले आदी संस्थाचालकांचा समावेश होता.

# जन्मदात्या पित्याच्या विरहात मुलानेही २४ तासांच्या आत सोडले प्राण

## ब्रम्हपुरीतील बोंडेगाव वार्डातील घटनेने शहर सुन्न

ब्रम्हपुरी/ महेश पिलारे

अथक परिश्रमाने लेकरांना आपल्या पायावर उभे करणाऱ्या एका हसत्याखेळत्या कुटुंबावर काळाने असा घाला घातला आहे, ज्याने संपूर्ण ब्रह्मपुरी शहराचे मन सुन्न झाले आहे. आईची प्रकृती खालावली, आई अंथरुणावर खितपत पडली आहे म्हणून मुलगा तिला पाहण्यासाठी आला, परंतु दोन दिवसांतच त्याचे अचानक निधन झाले. वडिलांच्या अंतिमविधीचा कार्यक्रम पार पडण्यापूर्वीच, संपूर्ण कुटुंब शोकसागरात बुडालेले असतानाच दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांच्या मुलाला हृदयविकाराचा झटका आला आणि वडिलांच्या पाठोपाठ मुलानेही जगाचा हा निरोप घेतला. हा हृदयद्रावक प्रसंग ब्रह्मपुरी शहरातील बोंडगाव वार्ड येथे घडला. नामदेव पंढरी तूपट (वय ७० वर्षे) आणि तुळशीदास नामदेव तूपट (वय ४२ वर्षे) अशी वडील व मुलाची नावे आहेत.

ब्रह्मपुरी शहरातील बोंडगाव वार्ड येथील रहिवासी नामदेव पंढरी तूपट यांना कोमल व तुळशीदास ही दोन मुले आहेत. त्यांनी शेतात राबराब राबून दोघांनाही स्वत:च्या पायावर उभे केले. कोमल हा मोठा मुलगा गावातच राहून शेती व मजुरी करतो. तर तुळशीदास हा लहान असून अमरावती जिल्ह्यातील धामणगाव रेल्वे येथील आश्रम शाळेत शिक्षक म्हणून कार्यरत आहे, तर त्याची पत्नीसुद्धा धामणी (जिल्हा अमरावती) येथे शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत. त्यांचा सुखी संसार सुरू असून त्यांना एक



मुलगा आहे.

काही दिवसांपूर्वी तुळशीदास यांना आपल्या आईची प्रकृती बरी नसून ती अंथरुणाला खिळली असल्याची माहिती मिळाली. त्यांनी लगेच बोंडगाव येथील आपले घर गाठत आई व कुटुंबीयांची भेट घेतली. आपल्या आईची ममतेच्या वात्सल्याने विचारपूस केली आणि राहत्या घरी दोन दिवस मुक्काम केला. दोन दिवसांचा कालावधी उलटल्यानंतर अचानक सायंकाळी ७:३० वाजता नामदेव पंढरी तूपट यांचे निधन झाले. वडिलांच्या निधनाचे तीव्र दुःख झाल्यामुळे संपूर्ण कुटुंब शोकसागरात बुडाले होते.

बाप गेल्याचे दु:ख उराशी असतानाच, वडिलांच्या पार्थिवावर अंतिम संस्कार (मुखाग्नी) करण्यापूर्वीच सकाळी १०:०० वाजताच्या सुमारास तुळशीदास यांना अस्वस्थ वाटू लागले. त्यांनी लगेच घरातील एका सहकाऱ्याला सोबत घेऊन ब्रह्मपुरी उपजिल्हा रुग्णालय गाठले. परंतु, नियतीला त्यांचे जगणे मान्य नव्हते; रुग्णालयातच त्यांना तीव्र हृदयविकाराचा झटका आला आणि क्षणातच तुळशीदास यांनी जगाचा निरोप घेतला. वडिलांच्या पाठोपाठ मुलानेही प्राण सोडल्यामुळे संपूर्ण बोंडगाव परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. पित्याला मुखाग्नी देण्यापूर्वीच आणि वडिलांच्या विरहाचे गाठोडे उराशी बाळगून अवघ्या चोवीस तासांतच मुलाने प्राण सोडल्यामुळे नियतीच्या या अथांग क्रौर्याने संपूर्ण ब्रह्मपुरीच्या काळजाचा ठोका चुकवला आहे. वडील जाण्याचा विरह आणि आघात सहन न झाल्यामुळेच मुलानेही प्राण त्यागल्याची चर्चा आता सर्वत्र सुरू असून, एकाच घरातील या पिता-पुत्राच्या अकाली निधनामुळे संपूर्ण बोंडगाव परिसरात शोककळा पसरली आहे. पित्याच्या पार्थिवावर दुपारी एक वाजता बोंडेगांव स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले तर त्यांच्या मुलाच्या पार्थिवावर रात्री अत्यसंस्कार करण्यात आले.

# मच्छीमार बांधवांना तातडीची आर्थिक मदत द्या

## दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर भाजप महामंत्री स्वप्निल अलगदेवे यांची मागणी

ब्रम्हपुरी/का.प्र.

चंद्रपूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यात यंदा अल्प पर्जन्यमानामुळे तलाव व जलाशयांमधील पाणीसाठा मोठ्या प्रमाणात घटला असून, त्याचा गंभीर फटका मत्स्यव्यवसायाला बसत आहे. या दुष्काळसदृश परिस्थितीमुळे मत्स्यबीज संवर्धन, माशांची वाढ आणि मत्स्योत्पादनावर प्रतिकूल परिणाम झाला आहे. परिणामी, मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था आणि त्यांच्यावर अवलंबून असलेल्या हजारो मच्छीमार कुटुंबांसमोर आर्थिक संकट उभे ठाकले आहे. या पार्श्वभूमीवर भाजपाचे ब्रह्मपुरी शहर महामंत्री स्वप्नील श. अलगदेवे यांनी पालकमंत्री अशोक उईके यांना निवेदन देऊन मच्छीमारांना तातडीने आर्थिक मदत देण्याची मागणी केली आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील अनेक मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था तलाव, जलाशय तसेच नदी-नाल्यांवर अवलंबून आहेत. या व्यवसायातून हजारो मच्छीमार कुटुंबांना रोजगार आणि उपजीविकेचे साधन मिळते. मात्र, यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने जलस्रोतांमधील पाणी कमी झाले आहे. त्यामुळे मत्स्यबीज सोडणे, त्याचे संवर्धन करणे आणि अपेक्षित मत्स्योत्पादन घेणे कठीण झाले आहे. परिणामी, संस्थांचे आर्थिक गणित कोलमडले असून, मच्छीमार कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर बनला आहे.अनेक मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांनी तलावांमध्ये मत्स्यबीज सोडण्यासाठी आणि त्यांचे संवर्धन करण्यासाठी मोठी गुंतवणूक केली आहे. मात्र, पाण्याची पातळी घटल्याने या गुंतवणुकीवर प्रतिकूल परिणाम झाला आहे. अपेक्षित उत्पादन मिळण्याची शक्यता कमी झाल्याने संस्थांना आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. ही परिस्थिती केवळ व्यावसायिक नुकसानीची नसून, ग्रामीण भागातील रोजगार आणि आर्थिक स्थैर्याशी संबंधित आहे.

त्यामुळे शासनाने या संकटाकडे गांभीर्याने लक्ष देऊन बाधित संस्थांना आणि मच्छीमार कुटुंबांना दिलासा देणे आवश्यक असल्याचे अलगदेवे यांनी म्हटले आहे.निवेदनातून त्यांनी सहा प्रमुख मागण्या केल्या आहेत. त्यामध्ये जिल्ह्यातील मत्स्यव्यवसायावर ओढवलेल्या दुष्काळसदृश परिस्थितीची तातडीने पाहणी करून वस्तुनिष्ठ पंचनामे व नुकसानमूल्यांकन करणे, परिस्थितीनुसार मत्स्य दुष्काळ जाहीर करण्याबाबत योग्य कार्यवाही करणे, नुकसानग्रस्त मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांना आणि मच्छीमार कुटुंबांना आर्थिक मदत देणे, मत्स्यबीज व मत्स्यसंवर्धनाच्या नुकसानीची भरपाई देण्याबाबत निर्णय घेणे, बाधित कुटुंबांसाठी विशेष पुनर्वसन व सहाय्य योजना राबविणे, तसेच संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांची आणि संस्थांच्या प्रतिनिधींची संयुक्त बैठक घेऊन प्रश्न सोडविणे, या मागण्यांचा समावेश आहे. दुष्काळसदृश परिस्थितीत शेतकऱ्यांप्रमाणेच मत्स्यव्यवसायावर अवलंबून असलेल्या कुटुंबांनाही शासकीय मदतीची गरज आहे. शासनाने वेळीच आर्थिक मदत दिल्यास अनेक कुटुंबांना मोठा दिलासा मिळेल आणि जिल्ह्यातील मत्स्यव्यवसाय टिकवून ठेवण्यास मदत होईल. त्यामुळे पालकमंत्री अशोक उईके यांनी तातडीने कार्यवाहीचे निर्देश द्यावेत, अशी मागणी स्वप्नील अलगदेवे यांनी केली आहे.

# पिकअपच्या धडकेत तरूण गंभीर जखमी

ब्रह्मपुरी/का.प्र.

नाटक ठरवून गावी परतणाऱ्या दुचाकीस्वाराला समोरून येणाऱ्या भरधाव पिकअप वाहनाने जोरदार धडक दिल्याची भीषण दुर्घटना गांगलवाडी फाट्याजवळ घडली. या अपघातात दुचाकीचालक तरुण गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर सध्या ब्रह्मपुरी येथील लोटस रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी निष्काळजीपणे वाहन चालवणाऱ्या अज्ञात पिकअप चालकाविरोधात पोलीस ठाण्यात विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरमोरी तालुक्यातील मोहझरी येथील रहिवासी मेघनाथ प्रल्हाद मांदाळी (वय ३२) हे आगामी ३१ जानेवारी २०२७ रोजी गावात होणाऱ्या मंडईच्या उत्सवासाठी नाटक ठरवण्याच्या उद्देशाने वडसा येथे गेले होते. ११ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजेच्या सुमारास ते गावातील केशव गुरनुले यांच्यासह आपल्या 'होंडा पॅशन एक्स प्रो' (क्रमांक MH 33 Y 9629) दुचाकीने निघाले होते. सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास गांगलवाडी फाट्याजवळ पोहोचले असता, समोरून येणाऱ्या एका अज्ञात भरधाव पिकअप वाहनाने मेघनाथ यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या भीषण धडकेमुळे दुचाकीवरील मेघनाथ आणि केशव हे दोघेही रस्त्यावर फेकले गेले. या अपघातात मेघनाथ यांच्या डाव्या पायाच्या मांडीला व ओठांना गंभीर दुखापत झाली. सोबत असलेल्या उमाजी टेकाम आणि रमेश ठाकरे यांनी तात्काळ त्यांना उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालय आरमोरी येथे दाखल केले. तेथे प्राथमिक उपचार केल्यानंतर पुढील उपचारासाठी रात्री १० वाजेच्या सुमारास त्यांचे मेहुणे पुरुषोत्तम वसाके यांनी त्यांना ब्रह्मपुरी येथील 'लोटस हॉस्पिटल'मध्ये भरती केले.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी रुग्णालयात जाऊन जखमी मेघनाथ मांदाळी यांचा जबाब नोंदवला. पीडिताच्या तक्रारीवरून निष्काळजीपणे वाहन चालवून अपघात घडवल्याप्रकरणी अज्ञात पिकअप चालकाविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १२५(अ), १२५(ब), २८१ तसेच मोटार वाहन कायदा कलम १३४ व १८४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सध्या जखमीची प्रकृती स्थिर असून, अपघातानंतर पसार झालेल्या पिकअप वाहनाचा व चालकाचा शोध पोलीस घेत आहेत.

# ब्रम्हपुरीत विजयकिरण फाऊंडेशनच्या वतीने गरबा, दांडिया स्पर्धा संपन्न



ब्रम्हपुरी/का.प्र.

गरबा-दांडिया हा केवळ नृत्याचा उत्सव नसून, भारतीय संस्कृतीचे जतन करणारा आणि महिला व युवतींना आपल्या कलागुणांचे सादरीकरण करण्यासाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देणारा उपक्रम आहे. अशा सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे महिलांमध्ये आत्मविश्वास वाढण्यासोबतच एकोपा आणि उत्साहाचे वातावरण निर्माण होते, असे प्रतिपादन युवक काँग्रेसच्या प्रदेश सरचिटणीस शिवानी वडेट्टीवार यांनी केले.

ब्रम्हपुरी येथे विधिमंडळ काँग्रेस पक्षनेते तथा आमदार विजयभाऊ वडेट्टीवार आणि विजयकिरण फाउंडेशन, नागपूर यांच्या वतीने गरबा-दांडिया स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी शिवानी वडेट्टीवार बोलत होत्या. यावेळी मंचावर महीला काँग्रेस अध्यक्षा योगिता आमले, कृउबा उपसभापती सुनीता तिडके, माजी नगरसेविका लता ठाकूर, न.प.सभापती बबीता आमले, माजी नगरसेविका वनिता अलगदेवे, नगरसेविका रेणू ठेंगरी, नगरसेविका जयश्री कुथे, नगरसेविका रंजना बुराडे, नगरसेविका ज्योती राऊत, नगरसेविका पुष्पलता पोपटे, नगरसेविका गीता मेश्राम, नगरसेविका हेमलता सिंहगडे, शहर कार्याध्यक्ष सुधा राऊत, सोशल मीडिया प्रमुख रश्मी पगाडे, महीला काँग्रेस सचिव सुशीला सोंडवले, सुष्मा नागमोती, सुनीता पंचवटे, कल्पना तुपट यांची उपस्थिती होती.

शिवानी वडेट्टीवार पुढे म्हणाल्या की, आजच्या महिला आणि युवती प्रत्येक क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवत आहेत. त्यांच्या अंगभूत कलागुणांना प्रोत्साहन देणे आणि त्यांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे. विजय वडेट्टीवार आणि विजयकिरण फाउंडेशन यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेली ही स्पर्धा महिलांच्या कलागुणांना प्रोत्साहन देणारी आहे. अशा उपक्रमांमुळे महिलांना स्वत:मधील कला सादर करण्याची संधी मिळते, तसेच सांस्कृतिक परंपरांशी असलेली नाळ अधिक घट्ट होते.

स्पर्धेचा प्रथम क्रमांक ३१ हजार रुपये जेन बीट गरबा स्टुडीओ ब्रम्हपुरी, द्वितीय क्रमांक २१ हजार रुपये सखी मंच गरबा गृप ब्रम्हपुरी यांनी तर तृतीय क्रमांक ११ हजार रुपये गोपी बीट गरबा गृप ब्रम्हपुरी यांनी पटकावला. यावेळी प्रशिक्षक आशिष मुळे, प्रांजली मुंगले, अल्का खोकले, साधना केळझरकर, संगिता राऊत यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राहुल मैंद व एजाज खान यांनी केले. तर उपस्थितांचे आभार सुधीर पंदीलवार यांनी मानले.

## दुरदर्शनच्या 'सह्याद्री' वाहिनीवर डॉ. धनराज खानोरकर यांची मुलाखत

### २३ ऑक्टोबरला दुपारी १२ वाजता प्रसारीत होणार



ब्रम्हपुरी/का.प्र.

महाराष्ट्र शासनाच्या आणि रसिकांच्या पसंतीस उतरणाऱ्या दूरदर्शनच्या लोकप्रिय 'सह्याद्री' वाहिनीवरून शुक्रवार, दिनांक २३ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी ठीक १२:०० वाजता एका विशेष कार्यक्रमाचे प्रसारण होणार आहे. 'हॅलो सह्याद्री' या दर्जेदार कार्यक्रमांतर्गत 'साहित्याचा समर्पित प्रवास' या विषयावर एक महत्त्वपूर्ण मुलाखत प्रसारित केली जाणार आहे.

या विशेष कार्यक्रमात ब्रह्मपुरी येथील नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयाचे मराठी विभागप्रमुख, प्रसिद्ध कवी, लेखक, पत्रकार आणि स्तंभलेखक डॉ. धनराज खानोरकर हे प्रमुख सहभाग घेणार आहेत. त्यांच्या आजवरच्या प्रेरणादायी साहित्य प्रवासावर आणि लेखकीय अनुभवांवर या मुलाखतीत प्रकाश टाकला जाणार आहे. कार्यक्रमाचे नेटके संचालन विवेक अलोणी (नागपूर) हे करणार असून, निर्मिती मीनल पाठराबे (नागपूर) यांनी केली आहे. साहित्य, कविता आणि लेखनाची आवड असणाऱ्या तमाम वाचकांसाठी व रसिकांसाठी हा कार्यक्रम अत्यंत पर्वणी ठरणार आहे. तेव्हा, २३ ऑक्टोबरला दुपारी १२ वाजता 'सह्याद्री' वाहिनीवर हा कार्यक्रम आवर्जून पहावा, असे आवाहन नागपूर दूरदर्शनने केले आहे.

## भाकपच्या नेतृत्वातील शेतकरी आंदोलनाला यश

### गोसीखुर्द बाधित शेतकऱ्यांसाठी १०.३३ कोटींचे अनुदान मंजूर

ब्रम्हपुरी/का.प्र.

गोसीखुर्द उजवा कालवा प्रकल्पबाधित शेतकऱ्यांच्या वाढीव मोबदल्यासाठी आणि हक्काच्या अनुदानासाठी भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वात पुकारलेल्या प्रदीर्घ लढ्याला मोठे यश आले आहे. शासनाकडून शेतकऱ्यांच्या सानुग्रह अनुदानापोटी १०.३३ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला असून, येत्या एका आठवड्यात ही रक्कम थेट लाभार्थी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येईल, अशी अधिकृत माहिती गोसेखुर्द विभागाचे कार्यकारी अभियंता जावेद शेख यांनी दिनांक १९ ऑक्टोबर रोजी भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने निवेदन देऊन पाठपुरावा करीत असताना दिली आहे.

गोसीखुर्द कालवा बाधित शेतकऱ्यांना वाढीव मोबदला तात्काळ मिळावा आणि त्यांची होणारी आर्थिक पिळवणूक थांबवावी, या प्रमुख मागण्यांसाठी शेतकरी व भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने मागील एका वर्षापासून सातत्याने आंदोलने, धरणे आणि मोर्चे काढण्यात येत होते. भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे जिल्हा सह-सेक्रेटरी तथा राज्य कौन्सिल सदस्य विनोद झोडगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा सुरू होता.

या संदर्भात कार्यकारी अभियंता, गोसीखुर्द उजवा कालवा विभाग, ब्रह्मपुरी यांच्या कार्यालयाकडून प्राप्त पत्रानुसार, विभागात सानुग्रह अनुदानासाठी एकूण १,६२८ भूधारकांचे ४१६.९२९ हेक्टर आर क्षेत्र बाधित असून त्यासाठी एकूण २०.८५ कोटी रुपयांची आवश्यकता आहे. यापैकी सद्यस्थितीत ७८२ गटांचे २०६.६६ हेक्टर आर क्षेत्रांचे प्रस्ताव प्राप्त झाले होते. त्याकरिता आवश्यक असलेल्या १०.३३ कोटी रुपयांच्या निधीची मागणी करण्यात आली होती. हा निधी आता शासनाकडून मंजूर होऊन प्राप्त झाला आहे.

सदर अनुदान येत्या आठ दिवसांच्या आत संबंधित शेतकरी लाभार्थ्यांच्या खात्यावर ऑनलाइन पद्धतीने पूर्ण केले जाईल, असे आश्वासन संबंधित अधिकाऱ्यांनी दिले आहे.

## क्रांतीवीर बाबुराव शेडमाके शहीद दिन संपन्न



ब्रह्मपुरी/का.प्र.

येथील नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयात क्रांतीवीर बाबुराव शेडमाके शहिद दिन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ सुभाष शेकोकर व प्रा मेजर विनोद नरड यांनी प्रतिमेला माल्यार्पण करुन अभिवादन केले.

कार्यक्रमाला उपस्थित डॉ राजेंद्र डांगे, डॉ रेखा मेश्राम, डॉ धनराज खानोरकर, डॉ मोहन कापगते,डॉ युवराज मेश्राम, डॉ भास्कर लेनगुरे, डॉ सुनिल चौधरी, डॉ प्रकाश वट्टी, डॉ पद्माकर वानखेडे,डॉ अरविंद मुंगोले,डॉ योगेश ठावरी, डॉ अतुल येरपुडे, डॉ राजू आदे, डॉ बालाजी दमकोंडवार,डॉ कुलजित शर्मा,प्रा जयेश हजारे, पर्यवेक्षक प्रा आनंद भोयर,रोशन डांगे,अलोक मेश्राम, माणिक दुपारे व सर्वांनी पुष्प अर्पण करुन आदरांजली वाहिली. यशस्वीतेसाठी समिती प्रभारी डॉ मेश्राम, डॉ खानोरकर, प्रा धिरज आतला, प्रदीप रामटेकेंनी सहकार्य केले

### ... QUOTES ...

"Persistence is very important. You should not give up unless you are forced to give up."

- Elon Musk

### चारोळी

तुझ्यासारखी मैत्रीण असते
हिऱ्यासारखी मोलाची...
फक्त तोंड लावायचे नाही,
नाहीतर जीव घ्यायची...

रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल

# एल.एम.बी. पब्लिक स्कुलच्या विद्यार्थ्यांचे तालुकास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत घवघवीत यश




ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील नामांकित एल. एम. बी. पब्लिक स्कुल येथील विद्यार्थिनींनी तालुकास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत सुयश संपादन केले. जिल्हा क्रीडा परिषद चंद्रपुरद्वारे आयोजित तालुका स्तरीय शालेय मैदानी क्रिडा स्पर्धेमध्ये वय वर्षे १४ वयोगटातील व वय वर्षे १७ वयोगटातील विद्यार्थिनींनी बॅडमिंटन स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले व त्यांची जिल्हास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेसाठी निवड झाली.

तालुकास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत १४ वर्षाखालील निवेदिता मंडल, किमया बनकर, मनुश्री सदनपवार, सायली भोयर, आयुषी क्षीरसागर या विद्यार्थिनींनी सुयश संपादित केले. त्याचप्रमाणे वय वर्षे १७ वयोगटातील गरीमा शर्मा, साक्षी वंजारी, रिध्दी शिवनकर, हेजल भोयर या विद्यार्थिनींनी यश संपादन करून एल. एम. बी. पब्लिक स्कुलच्या शिरपेचात मानाचा तुरा खोचला. त्यामुळे त्यांच्यावर सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे.

विद्यार्थिनींनी मिळविलेल्या यशाबद्दल एल. एम. बी. पब्लिक स्कुलचें अध्यक्ष तथा नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव अशोकजी भैया, एल. एम. बी. पब्लिक स्कुलच्या संचालिका आशिता भैया मॅडम, मुख्याध्यापक कादिर कुरेशी सर, उपमुख्याध्यापिका रश्मी राठी मॅडम, पर्यवेक्षिका रश्मी झोडे मॅडम तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी या विद्यार्थिनीचा गौरव करून पुढील वाटचालीसाठी भरघोस शुभेच्छा दिल्या आहेत.

# गोंदिया-वडसा मेमू ट्रेन आता थेट आरमोरीपर्यंत

ब्रम्हपुरी/का.प्र.

रेल्वे प्रवाशांची वाढती मागणी आणि सुविधा लक्षात घेऊन रेल्वे मंत्रालयाने एक अत्यंत महत्त्वाचा आणि दिलासादायक निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार, गोंदिया आणि वडसा दरम्यान धावणारी मेमू ट्रेन आता थेट आरमोरी स्टेशनपर्यंत वाढवण्यात आली असून, यामुळे या परिसरातील प्रवाशांचा प्रवास अधिक सुकर, वेगवान आणि सोयीचा होणार आहे.

रेल्वे बोर्डाच्या सहसंचालक विवेक कुमार सिन्हा यांच्या स्वाक्षरीने १० ऑक्टोबर २०२६ रोजी जारी करण्यात आलेल्या अधिकृत पत्रानुसार, दक्षिण पूर्व मध्य रेल्वेच्या (SECR) बिलासपूर विभागांतर्गत या नवीन विस्ताराला हिरवा झेंडा दाखवण्यात आला आहे. त्यानुसार नवीन विस्तारानंतर गाड्यांचे सुधारित वेळापत्रक जाहीर करण्यात आले असून गाडी क्रमांक ६८८०६ (गोंदिया - आरमोरी मेमू) गोंदिया येथून तिची सुटण्याची वेळ रात्री १९:१० वाजता असून ती वडसा येथे रात्री २१:३० पोहचेल. वडसा येथून प्रस्थान केल्यानंतर आरमोरी येथे रात्री २२:०० वाजता पोहचणार आहे.

तसेच गाडी क्रमांक ६८८०८ (आरमोरी - चांदा किल्ला मेमू) आरमोरी येथून सुटण्याची वेळ सकाळी ०६:३० वाजता असून वडसा सकाळी ०७:०५ गाडीचे आगमन होणार आहे. वडसा येथून सकाळी ७.१५ वाजता गाडी सुटल्यानंतर चांदा फोर्ट येथे सकाळी ०९:५५ वाजता आगमन होणार आहे.

या नवीन विस्तारामुळे आरमोरी परिसरातील नागरिकांना थेट गोंदिया आणि चांदा फोर्ट (चंद्रपूर) दरम्यान प्रवास करणे अत्यंत सुलभ होणार आहे. विशेषत: दैनंदिन प्रवासी, नोकरदार वर्ग आणि व्यापारी वर्गाचा प्रवास अधिक सुखकर होईल. ही मुदतवाढ लवकरच सोयीस्कर तारखेपासून प्रत्यक्ष प्रवाशांच्या सेवेसाठी सुरू केली जाणार असून, रेल्वे प्रशासनाकडून यासंदर्भात व्यापक प्रचार व प्रसार करण्याचे निर्देश संबंधित विभागांना देण्यात आले आहेत. रेल्वेच्या या निर्णयामुळे आरमोरीवासीयांमध्ये व प्रवाशांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

**जल है तो कल है...**




# Miracle constructions & Developers

श्रीराम नगरी - डेव्हलपर्स

NATP प्लॉट्स उपलब्ध

- सिंदेवाही
- नवरगांव
- तळोधी
- चंद्रपुर (चौराळा)

संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501

डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.


# अभिजित वंजारी, सुधाकर कोहळे आणि...

(पान क्र. १ वरून)

विशेषत: 'जेन झी' आणि तरुण पदवीधरांचा त्यांना चांगला पाठिंबा मिळत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

भाजपचे माजी आमदार अनिल सोले यांनीदेखील सुरुवातीला अपक्ष म्हणून अर्ज दाखल करत बंडखोरीचे संकेत दिले होते. मात्र, पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी आणि पदाधिकाऱ्यांनी केलेल्या मध्यस्थीनंतर त्यांची मनधरणी करण्यात आली. परिणामी, अनिल सोले यांनी निवडणुकीतून माघार घेत भाजपचे अधिकृत उमेदवार सुधाकर कोहळे यांना जाहीर पाठिंबा दर्शविला आहे.

प्रचाराच्या अंतिम फेरीत आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहेत. विरोधी पक्षांकडून विद्यमान आमदार अभिजीत वंजारी यांच्यावर कार्यकाळात विधानसभा क्षेत्रात व पदवीधरांच्या संपर्कात फारसे न राहिल्याचा गंभीर आरोप केला जात आहे. दुसरीकडे, काँग्रेस आणि भाजपच्या पारंपरिक कार्यकर्त्यांसह अपक्ष उमेदवार नितेश कराळे गुरुजी यांनी घरोघरी आणि व्यक्तिगत संपर्कावर भर देत मतदारांपर्यंत पोहोचण्याचा सपाटा लावला आहे.

एकंदरीत, पारंपरिक राजकीय पक्ष विरुद्ध लोकप्रिय चेहरा अशी रंगलेली ही लढत नागपूरच्या पदवीधर राजकारणात मोठी उलथापालथ घडवून आणण्याची दाट शक्यता आहे. आता २३ ऑक्टोबरच्या मतदानात पदवीधर मतदार नेमका कोणाच्या पारड्यात आपले मत टाकून कौल देतात, याकडे संपूर्ण विदर्भाचे लक्ष लागून आहे.

●●●●●●●

# ने.हि. कन्या विद्यालयाच्या हॅण्डबॉल...

(पान क्र. १ वरून)

तज्ज्ञ मार्गदर्शकांचे सहकार्य अत्यंत मोलाचे ठरले आहे. राष्ट्रीय हॅण्डबॉल खेळाडू सुरज मेश्राम व शुभम जंगले, क्रीडा प्रशिक्षक भारती मॅडम आणि बारेकर सर यांचे सखोल व कसदार मार्गदर्शन या विद्यार्थिनींना लाभले. याशिवाय, शाळेतील सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि जागरूक पालकवर्गाचे निरंतर प्रोत्साहन व सहकार्य लाभल्यामुळेच नेवजाबाई हितकारिणी कन्या विद्यालयाने हे यश संपादन केले आहे. या मुलींच्या यशामुळे ब्रह्मपुरीच्या क्रीडा वर्तुळात सध्या उत्साहाचे व आनंदाचे वातावरण पसरले आहे.

**ब्रम्हपुरी समाचारच्या अंकाकरीता**

**www.bramhapurisamachar.com/bs**

**या ऑनलाईन साईटला भेट द्या**

**बातम्यांकरीता संपर्क :**
मो. 9503100964
मो. 8275715315


Lubi PUMPS-MOTORS

बुधवार बंद

- दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.

सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता

# गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी

रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी

फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053

Kirloskar CRI

ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता


Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404